# परीक्षा

अलीकडे, केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्या पातळीवर, शालेय शिक्षणातील 'परीक्षा' नामक घटकाबाबत बरेच निर्णय किंवा त्याबाबतचे मानस घोषित करण्यात आले आहेत. साहजिकच प्रसारमाध्यमांतून, संबंधित शैक्षणिक वर्तुळातून आणि सर्वसामान्य समाजातही त्यांविषयीच्या चर्चा, मत-मतांतरे यांना ऊत आला आहे. यावरून 'परीक्षा' हा अतिशयच संवेदनशील असा विषय आहे, असे दिसून येत आहे. आठवीपर्यंत परीक्षाच नाही, एस एस सी व तत्सम बोर्ड्स व त्यांच्या परीक्षा रद्द व ऐच्छिक करणे, दहावी परीक्षेचे निकाल यंदा एकदम उंचावणे किंवा दहावी बोर्डाच्या परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना एटीकेटीची सवलत देवून अकरावीत प्रवेश घेऊ देणे अशा प्रकारच्या विविध घटकांनी 'परीक्षे'ला चर्चांमध्ये केंद्रस्थानी ठेवले आहे. 'परीक्षा असूच नयेत' या टोकापासून ते परीक्षा नसतील तर शिक्षणच होणार नाही' या टोकापर्यंतची मते या चर्चांमध्ये व्यक्त झाली आहेत. परिणामत: संभ्रम मात्र वाढला आहे.

परीक्षेविषयी, तिच्या मुक्तामुक्ततेविषयी नेटकेपणाने विचार करण्याची गरज आहे.

घरी काही मंडळी आली होती. गप्पा चालल्या होत्या. आलेल्यांपैकी कोणीही प्रत्यक्षपणे शिक्षणाशी संबंधित नव्हते. पण प्रत्येजण स्वतः विविध स्तरांवरील शिक्षणाच्या मांडवाखालून गेलेला असतो. त्याचे स्वतःचे असे शिक्षणाविषयी काही तरी मत असतेच. 'परीक्षा नसतील तर फार बरे होईल, मुलांना शिकताना तन येणार नाही'. 'पण, परीक्षा नसेल तर अभ्यासही करणार नाहीत मुले!' 'आणि परीक्षा नसेल तर स्पर्धा कशी होणार मुलांमध्ये? 'आणि कॉलेजला प्रवेश कुणाला, कसा देणार? अशी एक ना अनेक मते चर्चेमध्ये व्यक्त झाली. सर्वसामान्य आशय मात्र एकच होता; 'परीक्षा हवीच!' परीक्षेविषयीच्या या सर्वसामान्य माताचीही एकदा नेमकेपणाने फोड व्हायला हवी.

मुलांचा शाळेतील प्रवेश हा शिकण्यासाठी असतो. ती नीटपणे शिकताहेत न? त्यांना काही अडचणी येताहेत का? काही अडते आहे का? कळत नाही असे का होते आहे? हे सारे सातत्याने कळत राहण्यासाठी मुलांचे 'मूल्यमापन' करीत राहावे लागते. मूल्यमापणाने दोन शैक्षणिक हेतू साध्य होतात. एक, विशिष्ट विषयात, विशिष्ट वेळेला विद्यार्थी कुठे आहे हे शिक्षकाला, पालकाला व खुद्द त्या विद्यार्थ्याला काळणे; आणि दोन, तो जिथे अडला असेल, त्याला जे काही येत नसेल ते यावे म्हणून पुन्हा तयारीची संधी मिळणे. पुनर्शिक्षणाची संधी देऊन विद्यार्थ्याच्या राहून गेलेल्या, येत नसलेल्या भागाची तयारी करवून घेण्याची, त्याला पूर्णांशाने विशिष्ट विषय, विशिष्ट भाग येईल ह्याची जबाबदारी शिक्षकाची असते. तसेच अशाप्रकारे पुनर्तयारीची व्यवस्था शिक्षणरचनेतच असावी लागते. अशी मूल्यमापने, व्यक्तिगत पातळीवर आणि ठराविक कालक्रमाने करावी लागतात.

शिक्षणाची ठरविलेली उद्दिष्टे हा मूल्यमापनाचा पाया असतो. शिक्षणाची ठराविक उद्दिष्टे कालक्रमाने नि टप्प्याटप्प्याने साध्य होत आहेत न, हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या बाबतीत पाहण्याचे काम, मूल्यमापनाने करायचे असते. त्याचबरोबर तसे घडून येण्यासाठी पुनर्प्रयत्नांची संधी विद्यार्थी व शिक्षकांनी घ्यावयाची असते.

अशाप्रकारे, मूल्यमापन हे वैयक्तिकच असते आणि ते दोन स्तरांवर अंमलात यावे लागते. एक, विशिष्ट विषयाच्या आकलनाच्या स्तरावर, आणि दोन, शिक्षणाच्या व्यापक उद्दिष्टांच्या स्तरांवर. दोन स्तर भिन्न

असल्यामुळे साहजिकच त्या त्या मूल्यमापनाचे स्वरूप, आशय आणि पद्धती वेगवेगळया असतील, हे उघडच आहे.

## विषयाभ्यासाच्या स्तरावरील मूल्यमापन

विशिष्ट विषयाच्या बाबतीत, विशिष्ट वेळेला मुला-मुलीला काय येते आहे हे काळाने फारसे महत्त्वाचे नसते; तर काय येत नाही हे काळाने अतिशय महत्त्वाचे असते. मुलांबाबतचे सारे शैक्षणिक प्रश्न हे या घटनेशी संबंधित असतात. आणि या तात्कालिक प्रश्नांची सोडवणूक हे शिक्षकांचे प्रधान कार्य असते. सर्व विद्यार्थ्यांना सर्व विषय पूर्णांशाने कळण्याची-येण्याची जबाबदारी शाळेची असते. प्रयत्नांची काहीशी जबाबदारी, फार तर, विद्यार्थ्यांवर ढकलता येईल.

विद्यार्थ्यांची विषयाभ्यासाची तयारी कोणती व किती करायची आहे याचा मार्गदर्शक अभ्यासक्रम हा असतो. क्रमिक पुस्तक नव्हे. क्रमिक पुस्तक हे केवळ अभ्यासक्रमाची तोंडओळख असते. त्यामुळे साहजिकच क्रमिक पुस्तकावर आधारित मूल्यमापन हे अभ्यासक्रमातील दिलेल्या आशयाचे प्रतिनिधित्व करीत नाही. ते केवळ वरवरचे आणि म्हणून निरुपयोगी ठरते. अभ्यासक्रम हा काय शिकायचं याचा आशय सांगतो; त्याचबरोबर त्यासाठी लागणाऱ्या क्षमतांचेही सूचन करतो. क्रमिक पुस्तकांना ही ताकद कधीच नसते. म्हणून मूल्यमापन करायचे ते अभ्यासक्रमाशी संबंधित अशा आशयाच्या आकलनाचे आणि आत्मसात केलेल्या क्षमतांचे.

या विवेचनाच्या अंगाने आजच्या लेखी परीक्षांकडे पाहिले तर त्यांतील त्रुटी लक्षात येतील. मुख्य म्हणजे ही सारी परीक्षा क्रमिक पुस्तकांशी बांधलेली असते. त्यातही, क्रमिक पुस्तकांतील धड्यांचा जो काही आशय असतो तो निश्चित उत्तरे असलेल्या प्रश्नांमध्ये रूपांतरित केला जातो; म्हणजेच केवळ माहितीशी संकुचित केला जातो. प्रश्नाच्या उत्तरातून मागितलेली माहिती ही आशयापासून तुटली जाते. त्यामुळे एकसंध  साकलिक आशयाच्या आकलनाला तेथे अजिबात स्थान नसते.

समजा दोन विद्यार्थी आहेत आणि त्यांना परीक्षेत उत्तम आणि समान गुण मिळाले आहेत. परंतु एकाने लिहिलेली उत्तरे ही त्याच्या संपूर्ण आशयाच्या आकलनातून आली आहेत;  आणि दुसऱ्यानेतीच उत्तरे दिली आहेत पण ती केवळ प्रश्नोत्तरे पाठ करून लिहिली आहेत तर कुणाचे शिक्षण अधिक चांगले झाले असे म्हणायचे? व्यवहारात अधिक उपयुक्त शिकणे कुणाचे झाले?

परंतु अडचण अशी आहे की परीक्षेच्या या अशा स्वरूपामुळे कोणीही पहिल्या प्रकारच्या विद्यार्थ्यांचे अनुकरण करणार नाही तर दुसऱ्याचेच करील. कारण एकच असेल की परीक्षा पास व्हायला त्याची गरज नाही. परीक्षा दोघांच्याही समान मानते, कारण, परीक्षा आकलनाचे मूल्यमापनच करीत नाही.

'म्हातारी मेल्याच दुःख नाही पण काळ सोकावतो' असा मराठीत एक वाकप्रचार आहे. एखाद दुसऱ्या विद्यार्थ्याच्या बाबतीतच असं घडतंय असं नाही. तर सामान्यतः सर्वत्र विद्यार्थ्यांची नि पालकांची अशी समजूत आहे की येन केन प्रकारेण मार्क मिळाल्याशी कारण. म्हणूनच आज पालकमान्य, शिक्षकमान्य अशा कॉपीचे प्रकार सर्रास बोकाळलेत.

वास्तविक कॉपी करून परीक्षा उत्तिर्ण होता येते हेच या परीक्षेचे फार मोठे अपयश आहे. परीक्षेला बसणारा प्रत्येक विद्यार्थी, कल्पना, भावना, विचार, बुद्धिमत्ता अशा सर्वच बाबतींत वेगळा पण सगळयांची परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे मात्र अगदी एकसारखी. म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्व असण्याला या परीक्षाप्रांतात वावच नाही. परीक्षा ही अनैसार्गीक्क बाब ठरते ती यामुळेच!

हे असे का घडले असेल? उत्तर एकच आहे. परीक्षांतील प्रश्नांचे वस्तुनिष्ठ स्वरूप, प्रत्येक प्रश्नाला ठराविकच उत्तर, आणि ते देण्यासाठी त्या उत्तरामागील आकलनाची नाळच तुटलेली असल्यामुळे संदर्भहीन असे अल्पशब्दी उत्तर – किंवा नुसतेच 'बरोबर' वाटणाऱ्या उत्तरापुढे टीकमार्क करणे यांमुळे सारी परीक्षा विद्यार्थ्याच्या मूल्यमापनाच्या दृष्टीने निरर्थक झाली आहे. यात पाठांतराव्यतिरिक्त अन्य क्षमतांना स्पर्शच होत नाही. त्यामुळे अपेक्षित मूल्यमापन होतच नाही.

हे परीक्षांचे वाढते वस्तुनिष्ठ स्वरूप कुठून आले? विद्यार्थ्यांची परस्परांशी तुलना करण्याच्या कल्पनेतून ही वस्तुनिष्ठ प्रश्नांची रेलचेल इथे करण्यात आली आहे. मुळात शाळांचे काम आहे ते प्रत्येक विद्यार्थ्याला परिपूर्णतेने शिक्षण देण्याचे. शाळांना नि शाळांमधील शिक्षकांना हे जमत नाही म्हणून ते अपुऱ्या झालेल्या शिक्षणाचा दोष त्या त्या विद्यार्थ्यांच्या माथी मारतात; वास्तविक विद्यार्थ्यांना पुरेसे येत नाही हा दोष प्रामुख्याने शाळा-शिक्षकांचा आहे. परंतु त्यांची दोषमुक्तता करून विद्यार्थ्यांना त्याबदल्यात दोषी धरण्याचे कारस्थान रचले जाते. या कारस्थानाचाच एक भाग म्हणजे विद्यार्थ्यांची, त्यांच्या परीक्षांतील मार्कांच्या सहाय्याने परस्परांशी तुलना करणे. प्रत्येक विद्यार्थी शाळेत येतो ते स्वतःच्या परिपूर्णतेने शिकण्यासाठी. दुसऱ्या कोणापेक्षा जास्त किंवा कमी शिकण्यासाठी येत नाही. त्यामुळे तो दुसऱ्यापेक्षा कमी वा जास्त शिकला आहे हे विद्यार्थ्याला दाखवून देणे हे शाळेचे कामच नव्हे. परंतु शाळा हे करते कारण त्यामुळे अपुऱ्या शिकण्याचा द्वेष त्यातून परस्पर विद्यार्थ्यांकडे ढकलता येतो, आणि शाळांना त्यापासून नामानिराळे राहता येते. वास्तविक आपल्या मुलांना, जे शाळेत जाऊन यायला हवे, पण येत नाही, याचा जाब पालकांनी शाळांना विचारायला हवा. परंतु ते तसे करत नाहीत, कारण, ते शाळांच्या फसवणुकीला बळी पडत आपल्या पाल्यांचीच दोष देत राहतात.

शालेय परीक्षांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांची परस्परांत तुलना करणे आणि त्याकरवी विद्यार्थ्यांच्या माथ्यावर 'हुशार' अथवा 'ढ' असा कायमस्वरूपी शिक्का मारणे ही गुन्हेगारी आणि म्हणून अन्याय्य कृती समजली पाहिजे. कमालीच्या त्रुटी असलेल्या, कोणत्याही क्षमतांचे तर नाहीच पण साधे विषयाच्या नेमक्या आकलनाचेही निदान करू न शकणाऱ्या लेखी परीक्षांना विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तांचे कायमचे निदान करण्याची जबाबदारी देणे कदापीही योग्य ठरणार नाही. हे म्हणजे फुटक्या, गळक्या मापांनी दुधाचा रतीब घालण्यासारखे आहे.

विद्यार्थ्यांची परस्परांशी तुलना करणे आणि त्यांच्यात मार्कांसाठी स्पर्धा लावून, त्यांचे निरर्थक ताण निर्माण करणे हे अत्यंत अशैक्षणिक कृत्य आहे; आणि परीक्षा हे त्यांचे साधन आहे. करायचे त्याचे मूल्यमापन तर परीक्षा करतच नाही, उलट विद्यार्थ्यांवर इतके निर्माण होतात की परीक्षांच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी चक्क आत्महत्या करताहेत हा आपला गेल्या कित्येक वर्षांचा अनुभव आहे. विशिष्ट विषयांच्या तयारीच्या बाबतींत विद्यार्थी कुठे आहे हे कळाणे म्हणजे त्याला काय येत आहे याचबरोबर काय येत नाही हे कळाणे, त्या-त्या वेळी कळणे आवश्यक असते .वार्षिक लेखी परीक्षा फक्त काय येते याचा शोध घेतात आणि काय येत नाही ते हवेतच

सोडून देतात. त्यासाठी पुढे खास प्रयत्न करणे आजच्या आख्या शिक्षण व्यवस्थेतच नाही. मुल्यामापनाचा हेतू, न येणाऱ्या बाबींचा शोध घेऊन त्यावर कष्ट घेण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांना उद्युक्त करणे, हा असतो. त्यासाठी व्यक्तिगत नि व्यक्तीनिष्ठ मूल्यमापन आणि सातत्यपूर्ण असावे लागते. आजच्या परीक्षा पद्धतीत आणि उत्तीर्ण अनुत्तीर्ण या शिक्कामोर्तब पद्धतीत ही शैक्षणिक गोष्ट पूर्णपणे टाळलीच आहे.

आणखी एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे ती अशी की प्रचलित परीक्षा-लेखी परीक्षा-पद्धती फक्त विद्यार्थ्याने परीक्षेच्या क्षणाला उतराण्यापुर्ती माहिती कितपत साठवली आहे याचा अंदाज देते ( एक तर मिळवलेली सर्व माहिती मांडण्याची संधी तीन तासांच्या लेखी परीक्षेत असतच नाही! दुसरे म्हणजे जे परीक्षेत विचारले नाही ते विद्यार्थ्याला येतच आहे, असे काहीसे उगीचच गृहीत धरले जाते! ) पण, अभ्यासक्रमाने समोर ठेवलेल्या क्षमता विकासाचे नि त्यांच्या मूल्यमापनाचे काय? त्याचा पुसटसा सुद्धा अंदाज या लेखी परीक्षा देत नाहीत. आणि पुढे व्यवहारांत तर विद्यार्थ्यांना या क्षमतांच्या आधारेच जगायचे असते; परीक्षेत विचारलेल्या माहितीच्या आधारावर खचितच नव्हे! असे असताना मग आपण माहितीवर आधारित परीक्षांचा अट्टाहास का करतो आहोत? ते शिक्षकांना करायला सोपे आहे म्हणून?

**व्यापक उद्धीष्टांच्या स्तरावरील मूल्यमापन**

शालेय शिकण्याची व्यापक उद्धिष्टे ही, विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा विकास घडवून आणून त्यांची आयुष्यभराची तयारी करून देणारी असतात. शिक्षणातील हि घटना सगळयांत महत्वाची असते. सारी शिक्षणरचना, अभ्यासक्रम, शाळांतील प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहार, त्यांतील शिकण्या-शिकविण्याच्या पद्धती आणि त्या अनुषंगाने करावयाचे व्यावस्थापन, या साऱ्यांची दिशा ठरविण्याचे काम, हि व्यापक उद्धिष्टे करीत असतात. आपली आजची ( उद्यासाठीची ) शैक्षणिक उद्धिष्टे कोणती आणि त्यानुसार शिक्षणक्षेत्राची आखणी कशी केली जावी यावर विचार मंथन होत नाही. मानवी जीवन जर बदलत जात असेल तर त्यासाठी म्हणून ठरविली जाणारी उद्धिष्टेही बदलत जाणे अपरिहार्य असते. निदान दर पिढीला तरी नव्याने ही संधी द्यायला हवी. सामान्यपणे दर वीस वर्षांनी हा आढावा सखोलपणे घेतला गेला पाहिजे.

या उद्धिष्टांचे रुपांतर अभ्यासक्रमांत आणि अभ्यासक्रमाच्या उद्धिष्ट्पुर्तीसाठी दैनंदिन शालेय शिक्षणव्यवहारांची मांडणी करून मग वैयक्तिक विद्यार्थी या उद्धिष्ट्पुर्तीच्या विकासपथावर पायरीपायरीने प्रवास करीत असल्याची खात्री करून घेण्यासाठी सातत्यपूर्ण मूल्यमापन पद्धतीचा अंगिकार करायला हवा. ही मूल्यमापन पद्धती, अर्थातच, व्यक्तिनिष्ठ असेल आणि विद्यार्थ्यांमधील परस्पर तुलनेस तिथे वाव नसेल.

❖